# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९२४ /२०२२ दि. २२/१२/२०२२

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात व ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत ठाणे रेल्वे स्टेशन हे अत्यंत महत्वाचे व्यस्त रेल्वे स्टेशन आहे. ठाणे रेल्वे स्टेशन येथून दररोज नोकरदार वर्ग, कामगार तसेच शालेय विद्यार्थी प्रवास करीत असतात. तसेच सिडको बस स्टॉप कडून नवी मुंबई व कळवा परिसरात जाणे करीता NMMT बसेस व रिक्षाने प्रवासी मोठया प्रमाणात जात असतात. त्यामुळे सिडको बस स्टॉप कडून अशोक सिनेमा कडे व अशोक सिनेमा कडून सिडको बस स्टॉप कडे जाणाऱ्या रोडवर सकाळी व सायंकाळी मोठया प्रमाणात रिक्षा, कार, मोटारसायकल व पायी चालणारे नागरिक ये–जा करीत असतात. त्यामुळे ठाणे स्टेशन परिसर व मुख्य बाजारपेठ परिसर या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असते. याकरीता १) गोखले रोड कडून समर्थ भंडार मार्गे उजव्या लेन मधून अलोक हॉटेल कडे, २) सिडको बस स्टॉप कडून अशोक सिनेमा कडे, ३) चिंतामणी गल्ली मालतीबाई हॉस्पिटल कडून तलावपाळी, ४) मुख्य बाजारपेठ इलेक्ट्रिक गल्लीत मा. नगरसेवक, श्री. पवन कदम यांचे ऑफिस कडून गोल्डन सिनेमा कडे, ५) भंडार आळी गोल्डन सिनेमा कडून खारटन रोड कडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक दुचाकी, ऑटो रिक्षा, चार चाकी वाहने विरूध्द बाजूने जात असल्याने वाहतूक कोंडी होवून नागरिकांना त्रास होत आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) गोखले रोड कडून समर्थ भंडार मार्गे गावदेवी रोड उजव्या लेन मार्गे अलोक हॉटेल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना समर्थ भंडार येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ही समर्थ भंडार कडून डावे वळण घेवून गावदेवी बस स्टॉप कडून पंजाब नॅशनल बॅक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) सिडको बस स्टॉप कडून अशोक सिनेमा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सिडको बस स्टॉप येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने दादोजी कोंडदेव स्टेडियम मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) टॉवर नाका कडून जांभळी नाका मार्गे खारकर आळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना टॉवर नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने टॉवर नाका येथून चिंतामणी चौक मार्गे टेंभी नाका कडून कोर्ट नाका सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) चिंतामणी गल्ली मालतीबाई हॉस्पिटल कडून तलावपाळी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मालतीबाई हॉस्पिटल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने दगडी शाळा चरई येथून आम्रपाली हॉटेल परफेक्ट ड्रायव्हिंग स्कूल समोरून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) मुख्य बाजारपेठ इलेक्ट्रिक गल्लीत श्री. पवन कदम, नगरसेवक यांचे ऑफिस कडून गोल्डन सिनेमा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कल्पेश मेडिकल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने खारटन रोडने शिवसेना शाखा येथून माटे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

CamScanner

**प्रवेश बंद –** ६) भंडार आळी गोल्डन सिनेमा कडून खारटन रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गोल्डन सिनेमा येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मुख्य बाजारपेठ इलेक्ट्रिक गल्लीत श्री. पवन कदम, नगरसेवक यांचे ऑफिस कडून खारटन रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर**
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी .ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे**
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. ठाणेनगर, नौपाडा, कोपरी वाहतूक उप विभाग**
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner